# नि.दि.मु.क्र.२३४/२०११ मध्ये नि.५५ लगत आदेश

१) अर्ज आणि त्यावर देणेत आलेले हरकतदार प्रतिवादीचे म्हणणे वाचले. दोन्ही विद्वान वकिलांनी मांडलेला युक्तिवाद ऐकला.

२) या दाव्यातील सर्व कागदपत्रांचे वाचन केले. प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.२ याचे मुलींना दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामील करुन घेणेसाठी विनंती केली गेलेली आहे. वादीचे असे म्हणने की, सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ रचनेवर कोणताही बदल होणार नसुन ही दुरुस्ती मुद्यामहुन मागितली जात नाही. प्रस्तावित प्रतिवादी मुलींची लग्ने झालेली असल्याने त्याबद्यल वादींना काहीही कल्पना नव्हती आणि म्हणुन हा अर्ज बहाल करणेत यावा.

याच अर्जावर हरकतदार प्रतिवादीतर्फे लेखी म्हणने मांडले जावुन जोरदार हरकत नोंदविली गेली आहे. या हरकत प्रतिवादींचे म्हणने प्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती वेळकाढुपणाची असल्याचे आणि तो जाणीवपुर्वक दिला असल्याने ही दुरुस्ती मंजुर करणेत येवु नये. या प्रस्तावित प्रतिवादींचे पत्ते सुध्दा चुकीचे दिले गेलेले आहेत. सबब हा अर्ज फेटाळणेत यावा.

३) प्रस्तुतचे दुरुस्तीने वादी केवळ प्रतिवादी क्र.२ चे वारस मुलींना प्रतिवादीपणात सामील करु इच्छितात. प्रस्तावित प्रतिवादी हे मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस असल्याने त्यांचा दावा मिळकतीत हक्कसंबंध असु शकतो आणि त्यांचे गैरहजेरीत या दाव्याचा निर्णय गुणदोषावर होवु शकणारा नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावित दुरुस्तीने मुळ दावा कथनाला कोठेही बाधा येत नाही व त्यामुळे हरकतदार प्रतिवादींचे बचावास कोणताही धक्का लागत नाही.

४) मात्र वादीने यापुर्वी मयत प्रतिवादी क्र.२ चे केवळ पत्नी आणि मुलांना दुरुस्ती अर्ज देत पक्षकार म्हणुन सामील केलेले आहे. वास्तविकपणे हा अर्ज सुध्दा त्याचवेळी देणे आवश्यक होते किंवा प्रस्तावित प्रतिवादी मुलींची नावे त्या अर्जात नमुद करणे आवश्यक असताना सुध्दा वादींनी वेळीच ही काळजी घेतलेली नाही. सबब हा अर्ज बहाल करत असताना वादीवर खर्च बसवुन तो बहाल केलेस योग्य व न्याय ठरणारे आहे.

करीता पुढील प्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## :: आ दे श ::

१) वादीने प्रतिवादी क्र.१, २–अ ते २–क आणि ३ यांना प्रत्येकी रु.७५/– प्रमाणे आदेश तारखेपासुन चौदा दिवसांचे आत खर्च देणेचे अटीवर हा अर्ज बहाल करणेत येत आहे. दिले मुदतीत खर्चाची रक्कम रोख अदा करुन /न्यायालयात जमा करुन अर्जात मागणीप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दावा प्रत न्यायपटलावर ठेवणेत यावी.

स्वाक्षरीत/–

माजलगांव. ( शौ. रा. फकीर )

दि.२–८–२०१६ दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

माजलगांव